महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्रितीय अपिलीय अधिकारी अधिसुचित करण्याबाबत.......

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : टिपीएस-१८१५/प्र.क्र.१८८/१५/नवि-१३
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : १०/०७/२०१५

संदर्भ:- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५.

**प्रस्तावना**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दि.२८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसुचित करणे आवश्यक आहे. सदरहू अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने त्या पुरवित असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसुचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे.

०२. या विभागाच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकास विषयक प्रकरणांच्या सेवा विविध कार्यालयांमार्फत देण्यात येतात. खाली नमूद केल्याप्रमाणे अशा सेवा संबंधित कार्यालयाने अध्यादेशाच्या कलम-३ अनुसार अधिसुचित करण्याबाबतची कार्यवाही करावी.

| अ.क्र. | | लोक सेवांची सुची | कालावधी | अध्यादेशाच्या कलम-३ अनुसार लोकसेवा अधिसूचित करावयाचे कार्यालय |
|---|---|---|---|---|
| अ) | १. | प्रादेशिक योजनांचे, परिसर नकाशांचे झोन दाखला देणे. | ७ दिवस | अ) १ ते २ - संचालक, नगर रचना ,महाराष्ट्र राज्य , पुणे . |
| | २. | प्रादेशिक योजनांचे, परिसर नकाशांचे भाग नकाशा देणे. | ३ दिवस | |
| ब) | १. | जमिनीच्या रेखा नकाशांना / अभिन्यास नकाशांना (Lay out) अकृषक परवानगी देणे. | ६० दिवस | ब) १ ते ६ - संबंधित जिल्हाधिकारी . |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २. | प्रादेशिक योजना क्षेत्रातील महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधिल कलम-१८ (१) (iii) सह कलम-४४ नुसार **विविध विकास विषयक / बांधकाम परवाना देणे** (आवश्यकत्या नगर रचना कार्यालयाच्या संबंधित) | ६० दिवस | |
| | ३. | शासनाने दि.०३/०१/२०१५ च्या शासन निदेशांन्वये ठरवून दिलेल्या प्रमाणे लहान आकाराच्या अधिकृत भुखंडामध्ये प्रमाणभूत बांधकाम नकाशांप्रमाणे (Type Design.) नकाशे मंजूरीचे प्रस्ताव | १५ दिवस | |
| | ४. | प्रादेशिक योजना क्षेत्रातील महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधिल कलम-१८ (१) (iii) सह कलम-४४ नुसार "शेती तथा ना-विकास विभाग" या वापर विभागामध्ये *विविध वापराच्या* इमारतींसाठी **अधिमूल्य** आकारुन वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणे. | ३० दिवस | |
| | ५. | जोते प्रमाणपत्र (**Plinth Checking Certificate**) (आवश्यकत्या नगर रचना कार्यालयाच्या संबंधित) | १५ दिवस | |
| | ६. | पूर्णत्वाचे तसेच भोगवटा प्रमाणपत्र देणे **(Completion and Occupancy Certificate)** (आवश्यकत्या नगर रचना कार्यालयाच्या संबंधित) | १५ दिवस | |
| **क)** | १. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अन्वये मंजूर केलेल्या प्रादेशिक योजनेतील प्रस्तावांमध्ये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या अधिमुल्य आकारुन जमीन वापराचे फेरबदल | शासन निर्णय दि.०६/०५/२०१५ नुसार | **संबंधित विभागीय आयुक्त .** |
| **ड)** | १. | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ च्या तरतूदींनुसार परवानगी देणे बाबत | ६० दिवस | संबंधीत नियोजन प्राधिकरणाचे मुख्याधिकारी, आयुक्त तसेच संबंधीत विशेष नियोजन प्राधिकरणाचे/ क्षेत्र विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापकीय संचालक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ई) | १. | विशेष नियोजन प्राधिकरणाच्या विकास आराखड्याचे भाग नकाशे / झोन दाखले देणे. | ७ दिवस | ई) १ ते ४ - संबंधीत विशेष नियोजन प्राधिकरणाचे/ क्षेत्र विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी / व्यवस्थापकीय संचालक . |
| | २. | विशेष नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीतील विविध विकास विषयक / बांधकाम परवानगी देणे. | ६० दिवस | |
| | ३. | विशेष नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीतील विविध सुरु असलेल्या बांधकाम परवानगी प्रकरणात जोते प्रमाणपत्र (Plinth Checking) देणे. | १५ दिवस | |
| | ४. | विशेष नियोजन प्राधिकरणाच्या हद्दीतील विविध सुरु असलेल्या बांधकाम परवानगी प्रकरणात पूर्णत्वाचे तसेच भोगवटा प्रमाणपत्र देणे (**Completion and Occupancy Certificate**) देणे. | १५ दिवस | |

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(अविनाश पाटील)
सह सचिव
नगर विकास विभाग

**प्रत माहितीकरिता :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई.
२) मा.राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
४) प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.

**प्रत माहितीकरिता व उचित कार्यवाहीकरीता :-**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय आयुक्त, (सर्व)
३) जिल्हाधिकारी, (सर्व)
४) आयुक्त, महानगरपालिका, (सर्व)
५) मुख्यकार्यकारी अधिकारी, (एम.एम.आर.डी.ए.,पी.एम.आर.डी.ए.,सीडको).
६) उप संचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे (उक्त शासन निर्णय आपल्या स्तरावरुन सर्व संबंधितांना पाठविण्यात यावा).
७) मुख्याधिकारी, नगर परिषद (सर्व)
८) नगर विकास विभागातील सर्व कार्यासने.
९) निवडनस्ती (नवि-१३).

*******